नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१४
सुरेंद्र वि. सुनंदा
निशाणी क्र. १२४ खाली

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ सुरेंद्र यांचा पुढील उलट तपास प्रतिवादी क्र. २६ (१) ते २६ (३) व प्रतिवादी क्र. २८ व २९ यांचेतर्फे विधिज्ञ श्री.व्ही.पी.चिंदरकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>**

२७. सातबारा उता-यातील लागलेली प्रतिवादींची नावे कमी करण्याकरीता मी कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच, सदरची नावे चुकीचे आहे हे ठरवण्याकरीता मी काहीही केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर सातबारा उता-यातील प्रतिवादींच्या नावाच्या नोंदी बरोबर आहेत. मी प्रस्तूत दाव्यात प्रतिवादींनी दाखल केलेली कागदपत्रे पाहिलेली आहेत. सदर कागदपत्रामध्ये प्रतिवादींनी मिळकतीचे सरकार दस्त भरले आहे किंवा कसे हे मला समजले नाही. मी दावा मिळकतीचा सरकार दस्त भरला आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. आर्चिणे येथील खाते क्र.३८२ व ५०० यातील सरकार दस्त भरल्याच्या मुळ पावत्या **<u>नि.क्र.१६२ ते १७८</u>** प्रमाणे आहेत. फेरफार नोंदवहीची नक्कल क्र.१०८८ **<u>नि.क्र.१७९</u>** प्रमाणे आहे. वारसनोंद अनु.क्र.२९७ **<u>नि.क्र.१८०</u>** प्रमाणे आहे. वृक्षतोड परवानगीचा आदेश **<u>वस्तु-अ</u>** प्रमाणे आहे.

२८. मी फेरफार नोंद क्र.१०८८ नि.क्र.१७९ मधील प्रतिवादीचे वडिल विष्णू रत्नोजी रावराणे यांचे नाव कमी करण्याकरीता मी कोणतीही कारवाई केली नाही. महालकरी बावडा यांच्या आदेशाप्रमाणे प्रतिवादीचे नाव दावा मिळकतीत दाखल झाले आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वैभववाडी तालुका होण्यापुर्वी आर्चिणे हे गाव तालुका बावडा, जि.कोल्हापुर यामध्ये होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत ऐन, किंजळ, जांभळ व हेडा ही झाडे होती व आहेत. हे म्हणणे खरे आहे की, झाड तोडीची परवानगी घ्यावयाची असल्यास ते वृक्षअधिकारी कणकवली यांच्या कार्यक्षेत्रात येते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी रमेश विष्णू रावराणे यांनी दावा मिळकतीतील ऐन, किंजळ, जांभळ व हेडा यापैकी १०१ झाडे तोडण्याकरीता वृक्षअधिकारी कणकवली यांची परवानगी घेतली होती व झाडे तोडली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी

रमेश विष्णू रावराणे यांनी परवानगी घेऊन दावा मिळकतीतील झाडे तोडली होती. साक्षीदार स्वतः सांगतो की, प्रतिवादी रमेश विष्णू रावराणे यांनी सन २०१३ साली ऑक्टोबर महिन्यात झाडे तोडली नाहीत. प्रतिवादी रमेश विष्णू रावराणे याला झाडे तोडण्याकरीता परवानगी मिळू नये याकरीता किंवा परवानगी रद्द करण्याकरीता मी कोणतीही कारवाई केली नाही.

२९. जुन्या सातबारा उता–यापेक्षा नवीन सातबारा उता–याला पुराव्याच्या दृष्टीने जास्त महत्व आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१/०३/१९५९ रोजीपासून दावा मिळकतीवर विष्णू रत्नोजी रावराणे यांची त्यांच्या मृत्यूपर्यंत कब्जेवहिवाट होती. हे म्हणणे खरे आहे की, विष्णू रावराणे यांच्या मृत्यूपर्यंत दावा मिळकतीच्या सातबारा उता–यावर त्यांचे नाव होते व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस व प्रतिवादी यांचे नाव आहे.

३०. हे म्हणणे खरे आहे की, महालकरी बावडा यांच्या आदेशाप्रमाणे दावा जमिनीचे खाते विष्णू रावराणे यांच्या नावे झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१/०३/१९५९ पासून १२ वर्षे पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच दि.३१/०३/१९७१ रोजी प्रतिवादीचा विरुध्द कब्जा पुर्ण झालेला असल्यामुळे प्रतिवादीची मालकी विरुध्द कब्जाने पुर्ण झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीच्या विरुध्द प्रस्तूत दावा दि.३१/०३/१९५९ पासून बारा वर्षांच्या कालावधीत दाखल करणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे नाही की, मुदतीच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे माझे व माझ्यासोबत असलेल्या प्रतिवादींचे हक्क संपुष्टात आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी ऑक्टोबर २०१३ साली दावा मिळकतीतील झाडे परवानगी घेऊन तोडल्याबाबत मला कल्पना होती व आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी दावा मिळकतीची भुमि अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन हद्दठराव करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींची दावा मिळकतीवर सतत, उघड व विनाहरकत वहिवाट असून मी ती पाहिलेली आहे.

नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०१४
सुरेंद्र वि. सुनंदा
निशाणी क्र. १२४ खाली

३१. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी व प्रतिवादी क्र.१ ते १९ यांच्याव्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रतिवादीविरुध्द कोणतीही दाद न्यायालयाकडे मागितलेली नाही.

३२. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यात वंशावळीत दाखवलेल्या तीनही शाखेतील व्यक्तींची तीन घरे वेगवेगळी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वंशावळीतील आप्पा, रामचंद्र व भिवा हे एकमेकांचे सहहिस्सेदार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.२६ ते ३१ यांच्याकडे दावा मिळकती व्यतिरीक्त आर्चिणे गावात इतर मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सातबारा उतारा नि.क्र.१० चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर सातबारा उता–यातील नोंदी बरोबर नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमिनीत माझा कोणताळी हक्क नसल्यामुळे मला वाटपाची दाद मागण्याचा कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा दावा दाखल करुन चुकीची साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

''माझे समक्ष''
SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2023.07.27 10:52:09 +0530
(टी.एच. शेख)
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी

श्रवणोत्तर स्वीकृत
SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2023.07.27 10:52:13 +0530
(टी.एच. शेख)
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी

दिनांकः २६/०७/२०२३